पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाच्या अधिपत्याखालील जिल्हा परिषदेतील ग्रामीण पाणी पुरवठा विभाग / उपविभागामधील गट-ड संवर्गातील २५% पदे निरसित करण्याबाबत.

महाराष्ट्र शासन
पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग
शासन निर्णय क्रमांकः जिपग्रा-१२१७/प्र.क्र.३४२/पापु-२३
गोकुळदास तेजपाल रुग्णालय संकुल, ७ वा मजला
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
तारीख: २२ मार्च, २०१८

वाचा

१) पा.पु. व स्व.वि.,शासन निर्णय,क्रमांकः जिपआ२००८/प्र.क्र.१६७/पापु-२३,दि.४.११.२०११
२) पा.पु. व स्व.वि.,शासन निर्णय,क्रमांकः जिपआ-२०१४/प्र.क्र.१४१/पापु-२३, दि.४.८.२०१५
३) वित्त विभाग,शासन निर्णय,क्रमांकः संकीर्ण-२०१५/प्र.क्र.५७/२०१५/विसु-१,दि.१४.१.२०१६
४) ग्राम विकास विभाग,शासन निर्णय,क्रमांकः संकीर्ण-५०१६/प्र.क्र.८७/आस्था-८,दि.५.५.२०१६

प्रस्तावना :

वित्त विभागाच्या दिनांक १४.१.२०१६ च्या शासन निर्णयातील परिच्छेद १(५) नुसार गट-ड संवर्गातील मंजूर पदांच्या २५ टक्के पदे निरसित करणे आवश्यक आहे. त्यानुसार जिल्हा परिषदेतील ग्रामीण पाणी पुरवठा व स्वच्छता विभागातील ग्रामीण पाणी पुरवठा विभाग / उपविभागामधील गट-ड संवर्गातील पदे निरसित करण्याची बाब शासनाच्या विचाराधीन होती.

शासन निर्णय :

संदर्भाधीन (१) च्या शासन निर्णयान्वये जिल्हा परिषदेतील ग्रामीण पाणी पुरवठा विभाग / उपविभागामधील पदांचा व संदर्भाधीन (२) च्या शासन निर्णयान्वये नवनिर्मित पालघर जिल्हा परिषदेअंतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा विभागामधील पदांचा, असा ३४ जिल्हा परिषदेतील ग्रामीण पाणी पुरवठा विभाग व उपविभागामधील एकूण ४०२२ पदांचा आकृतिबंध निश्चित करण्यात आलेला आहे. सदर आकृतिबंधानुसार जिल्हा परिषदेतील ग्रामीण पाणी पुरवठा विभाग / उपविभागात गट-ड चतुर्थश्रेणी कर्मचारी संवर्गाची एकूण मंजूर पदसंख्या ७१७ (नाईक ३३ + परिचर/शिपाई ६१८ + चौकीदार ३३ + मदतनीस ३३) इतकी आहे.

२. शासन निर्णय वित्त विभाग, दिनांक १४.१.२०१६ च्या परिच्छेद १(५) नुसार गट-ड संवर्गातील मंजूर पदांच्या २५ टक्के पदे निरसित करणे आवश्यक आहे. त्यानुसार जिल्हा परिषदेतील ग्रामीण पाणी पुरवठा विभाग / उपविभागामधील गट-ड संवर्गातील मंजूर एकूण ७१७ पदांच्या २५ टक्के

म्हणजेच १७९ पदे निरसित करणे आवश्यक आहे. परंतू सदर संवर्गात सध्या रिक्त असलेली पदे विचारात घेऊन खालील ८१ पदे शासन निर्णयाच्या दिनांकापासून निरसित करण्यात येत असून उर्वरित ९८ पदे जशी रिक्त होतील तशी टप्प्याटप्प्याने यथावकाश निरसित करण्यात येतील.

अ.क्र.	पदाचे नांव	आकृतीबंधानुसार मंजूर पदसंख्या	निरसित करावयाची पदे	सुधारित पदसंख्या
१	नाईक	३३	१३	२०
२	परिचर / शिपाई	६१८	४४	५७४
३	चौकीदार	३३	१३	२०
४	मदतनीस	३३	११	२२
	एकूण पदे	७१७	८१	६३६

३. गट-ड संवर्गातील उपरोक्त पदांचा जिल्हा परिषदनिहाय तपशील “ विरणपत्र अ ” मध्ये देण्यात आलेला आहे. निरसित करण्यात आलेली पदे यापुढे भरण्यात येणार नाहीत याची काळजी संबंधित जिल्हा परिषदेच्या मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी घ्यावी. तसेच ज्या जिल्हा परिषदांची गट-ड संवर्गात एकुण मंजूर पदसंख्येच्या ७५ % पेक्षा अधिक पदे कार्यरत आहेत व त्यामुळे गट-ड संवर्गातील मंजूर पदसंख्येच्या २५ % पदे या शासन निर्णयान्वये निरसित झालेली नाहीत अशा जिल्हा परिषदांनी भविष्यात रिक्त होणारी पदे न भरण्याची काळजी घ्यावी.

४. ग्राम विकास विभागाच्या संदर्भाधीन (४) च्या शासन निर्णयान्वये गट-ड संवर्गातील मंजूर पदांपैकी २५ % पदे निरसित करण्यासाठी ६ महिन्यांची मुदत देण्यात आली आहे. त्यानुसार सर्व जिल्हा परिषदांनी कार्यवाही करावी.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संकेताक २०१८०३२२१६०७३४६१२८ असा आहे. हा आदेश डिजीटल स्वाक्षरीने साक्षांकित करुन काढण्यात येत आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

Balasaheb B Hajare

Digitally signed by Balasaheb B Hajare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=49ad4eefa4101394c1b1119b5f2d93940a592bd8a91d2970b24702e05968e19f, cn=Balasaheb B Hajare
Date: 2018.03.23 13:10:40 +05'30'

बाळासाहेब बा. हजारे
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन

प्रत,

१. मा. विधानसभा / विधान परिषद सदस्य (सर्व)

२. मुख्य सचिव यांचे उप सचिव, मंत्रालय, मुंबई
३. विभागीय आयुक्त, सर्व
४. जिल्हाधिकारी, सर्व
५. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
६. सदस्य सचिव, महाराष्ट्र जीवन प्राधिकरण, मुंबई
७. महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा परिक्षा)
८. महालेखापाल, महाराष्ट्र-१ मुंबई (लेखा अनुज्ञेयता)
९. महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर (लेखा परिक्षा)
१०. महालेखापाल, महाराष्ट्र-२ नागपूर (लेखा अनुज्ञेयता)
११. मुख्य लेखा व वित्त अधिकारी, जिल्हा परिषद (सर्व)
१२. कार्यकारी अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१३. जिल्हा कोषागार अधिकारी (सर्व)
१४. उप अभियंता, ग्रामीण पाणी पुरवठा उप विभाग, जिल्हा परिषद (सर्व)
१५. मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा, नवी मुंबई
१६. वित्त विभाग (व्यय-३, अर्थसंकल्प-१९, आपुक व वित्तीय सुधारणा-१), मंत्रालय, मुंबई
१७. कार्यासन पापु-०४ व पापु-२०, पाणी पुरवठा व स्वच्छता विभाग, मंत्रालय, मुंबई
१८. ग्राम विकास व जलसंधारण विभाग (आस्था-८), मंत्रालय, मुंबई
१९. निवड नस्ती, कार्यासन पापु-२३

विवरणपत्र अ

अ. क्र.	जिल्हा	नाईक वेतनश्रेणी ४४४०-७४४० (१६००)			परिचर / शिपाई वेतनश्रेणी ४४४०-७४४० (१३००)			चौकीदार वेतनश्रेणी ४४४०-७४४० (१३००)			मदतनीस वेतनश्रेणी ४४४०-७४४० (१३००)			एकूण		
शासन निर्णय पा.पु.व स्व.वि.क्रं.जिपग्रा-१२१७/ प्र.क्र.३४२/पापु-२३, दिनांक २२ मार्च, २०१८ सोबतचे सहपत्र																
जिल्हा परिषदांअतर्गत ग्रामीण पाणी पुरवठा विभाग / उपविभागामधील गट-ड संवर्गातील रिक्त पदे निरसित करणेबाबत																
		मंजूर पदे	निरसित पदे	सुधारित पदे	मंजूर पदे	निरसित पदे	सुधारित पदे	मंजूर पदे	निरसित पदे	सुधारित पदे	मंजूर पदे	निरसित पदे	सुधारित पदे	मंजूर पदे	निरसित पदे	सुधारित पदे
१	२	३	४	५	६	७	८	९	१०	११	१२	१३	१४	१५	१६	१७
१	ठाणे	१	०	१	१३	०	१३	१	०	१	१	०	१	१६	०	१६
२	पालघर	०	०	०	१२	३	९	०	०	०	०	०	०	१२	३	९
३	रायगड	१	१	०	२२	५	१७	१	०	१	१	०	१	२५	६	१९
४	रत्नागिरी	१	०	१	२८	२	२६	१	१	०	१	०	१	३१	३	२८
५	सिंधुदूर्ग	१	०	१	१६	०	१६	१	०	१	१	०	१	१९	०	१९
६	नाशिक	१	०	१	१६	४	१२	१	०	१	१	१	०	१९	५	१४
७	धुळे	१	१	०	१३	०	१३	१	१	०	१	०	१	१६	२	१४
८	नंदुरबार	१	०	१	१३	०	१३	१	१	०	१	०	१	१६	१	१५
९	जळगाव	१	०	१	२२	२	२०	१	०	१	१	१	०	२५	३	२२
१०	अहमदनगर	१	१	०	२५	०	२५	१	१	०	१	१	०	२८	३	२५
११	पुणे	१	०	१	२५	३	२२	१	०	१	१	०	१	२८	३	२५
१२	सातारा	१	०	१	३१	१	३०	१	०	१	१	१	०	३४	२	३२
१३	सांगली	१	१	०	१६	०	१६	१	०	१	१	१	०	१९	२	१७
१४	सोलापूर	१	०	१	२२	१	२१	१	०	१	१	०	१	२५	१	२४
१५	कोल्हापूर	१	०	१	२२	२	२०	१	०	१	१	०	१	२५	२	२३
१६	औरंगाबाद	१	०	१	१९	०	१९	१	०	१	१	०	१	२२	०	२२
१७	जालना	१	१	०	१६	२	१४	१	१	०	१	१	०	१९	५	१४
१८	परभणी	१	१	०	१३	०	१३	१	१	०	१	०	१	१६	२	१४
१९	हिंगोली	१	०	१	१३	०	१३	१	०	१	१	०	१	१६	०	१६
२०	बीड	१	०	१	१९	०	१९	१	०	१	१	१	०	२२	१	२१
२१	नांदेड	१	०	१	२२	२	२०	१	१	०	१	१	०	२५	४	२१
२२	उस्मानाबाद	१	०	१	१६	१	१५	१	०	१	१	०	१	१९	१	१८
२३	लातूर	१	०	१	१६	०	१६	१	१	०	१	०	१	१९	१	१८
२४	बुलढाणा	१	१	०	१९	१	१८	१	०	१	१	०	१	२२	२	२०
२५	अकोला	१	०	१	१६	१	१५	१	०	१	१	०	१	१९	१	१८
२६	वाशिम	१	१	०	१९	२	१७	१	१	०	१	१	०	२२	५	१७
२७	अमरावती	१	०	१	२५	२	२३	१	१	०	१	१	०	२८	४	२४
२८	यवतमाळ	१	०	१	२२	१	२१	१	०	१	१	०	१	२५	१	२४
२९	वर्धा	१	०	१	१३	२	११	१	०	१	१	०	१	१६	२	१४
३०	नागपूर	१	१	०	२२	४	१८	१	०	१	१	०	१	२५	५	२०
३१	भंडारा	१	१	०	१६	२	१४	१	१	०	१	१	०	१९	५	१४
३२	गोंदिया	१	१	०	१०	०	१०	१	१	०	१	०	१	१३	२	११
३३	चंद्रपूर	१	१	०	१६	०	१६	१	०	१	१	०	१	१९	१	१८
३४	गडचिरोली	१	१	०	१०	१	९	१	१	०	१	०	१	१३	३	१०
एकूण पदे		३३	१३	२०	६१८	४४	५७४	३३	१३	२०	३३	११	२२	७१७	८१	६३६

Balasaheb B Hajare

Digitally signed by Balasaheb B Hajare
DN: c=IN, o=Government Of Maharashtra, ou=Water Supply and Sanitation Department, postalCode=400032, st=Maharashtra, 2.5.4.20=49ad4eefa4101394c1b1119b5f2d93940a592bd8a91d2970b24702e05968e19f, cn=Balasaheb B Hajare
Date: 2018.03.23 13:11:19 +05'30'

(बाळासाहेब बा. हजारे)
कार्यासन अधिकारी, महाराष्ट्र शासन